**मे. आर्या स्टील्स रोलिंग (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. बी-६, कागल - हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत, गाव हलसवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर यांच्या प्रस्तावित एमएस. रोल्ड, टीएमटी बार, आणि स्ट्रक्चरल स्टील्स उत्पादन क्षमता ९००० मेट्रीक टन ते १५००० मेट्रीक टन प्रती महिना विस्तारीकरण प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

---

मे. आर्या स्टील्स रोलिंग (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. बी-६, कागल - हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत, गाव हलसवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर यांच्या प्रस्तावित एमएस. रोल्ड, टीएमटी बार, आणि स्ट्रक्चरल स्टील्स उत्पादन क्षमता ९००० मेट्रीक टन प्रती महिना ते १५००० मेट्रीक टन प्रती महिना विस्तारीकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दि. ०२-११-२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता कारखाना कार्यस्थळावर / प्रकल्प स्थळावर पार पडली.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. संजय तेली,<br>अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी<br>तथा निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर,<br>(मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी) | - | अध्यक्ष |
| २. | श्री. ज. शं. साळुंखे,<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर<br>(म.प्र.नि. मंडळाचे प्रतिनिधी) | - | सदस्य |
| ३. | श्री. प्रमोद रा. माने,<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,<br>कोल्हापूर. | - | संयोजक |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सर्वप्रथम श्री. प्रमोद रा. माने, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या मान्यतेने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी सांगीतले की, प्रकल्प व्यवस्थापनाने प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर केलेला होता, त्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी अटी व शर्तीसह टी.ओ.आर. मंजूर केला व त्या अनुषंगाने प्रकल्पकर्त्यांनी जनसुनावणी घेण्याबाबत प्रस्ताव सादर केला. पर्यावरण आंघात मुल्यांकन नोटीफिकेशन २००६ नुसार

प्रस्तावित प्रकल्पाच्या जनसुनावणीबाबत दि. २८.०९.२०२३ रोजी मराठी वर्तमानपत्र दैनिक पुढारी व इंग्रजी वर्तमानपत्र द टाईम्स ऑफ इंडिया या दोन स्थानिक वर्तमानप्रत्रामध्ये सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर; महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर; मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद; मा. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणाचे मुख्यालय, मुंबई व प्रादेशिक कार्यालय कोल्हापूर; उप विभागीय अधिकारी कार्यालय, इचलकरंजी; गट विकास अधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कागल, हातकणंगले, करवीर; तहसिल कार्यालय, कागल, हातकणंगले, करवीर; ग्राम विकास अधिकारी कार्यालय, ग्राम पंचायत तळंदगे, पट्टण कोडोली, कसबा सांगाव, रुई, हलसवडे, सांगवडे; मुख्याधिकारी कार्यालय, हुपरी नगरपरिषद या सर्व ठिकाणी प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, हरकती, सूचना, टिका टिप्पणी इ. सादर करण्यासाठी एक महिना अगोदर जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. पर्यावरण आघात मुल्यांकन नोटीफिकेशन २००६ नुसार हा प्रस्तावित प्रकल्प शेडयूल एक, प्रवर्ग ब मध्ये येत असून नोटीफिकेशन मध्ये दिलेल्या कार्यप्रणालीनुसार आज सर्व प्रथम प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक सल्लागार माहिती सादर करतील, त्यानंतर आपण आपल्या शंका, प्रश्न टिका टिप्पणी आपले नाव व गाव सांगून उपस्थित कराव्यात व त्याचे उत्तर पर्यावरण विषयक सल्लागार यांनी द्यावीत, तसेच लेखी निवेदने आमच्याकडे द्यावीत या सर्वाची नोंद घेवून त्याचे इतिवृत्त SEEC, महाराष्ट्र शासन यांचेकडे जसेच्या तसे सादर केले जाणार आहे व या प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावर घेतला जातो त्यामुळे सदर प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीबाबतचा कोणताही निर्णय उपस्थित समितीस घेण्याचे अधिकार नाहीत असे श्री. प्रमोद माने यांनी सांगितले..

या नंतर मा. श्री. संजय तेली, अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार प्रकल्पाबाबत पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून माहिती देतील त्यानंतर आपण शंका, तक्रार, सूचना, हरकत मांडावी तसेच लेखी निवेदन स्विकारले जाईल. या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीमध्ये जी चर्चा होईल त्याची जशीच्या तशी नोंद घेवून आम्ही इतिवृत्त शासनाकडे

पुढील निर्णयासाठी सादर करणार आहे, उपस्थित समिती कोणताही निर्णय घेणार नाही असे सांगितले.

यानंतर प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार श्री. राजेश मानकर, मे. सदर्न एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांच्यावतीने प्रस्तावित प्रकल्पाबाबत स्लाईड शो व्दारे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये प्रकल्पाची प्रस्तावना, प्रकल्पाच्या जागेचा नकाशा, प्रकल्प जागेचा १० किमी स्थलाकृति अभ्यास क्षेत्र नकाशा, प्रकल्पाचे उपग्रहाव्दारे घेतलेले छायाचित्र, प्रकल्प मांडणी नकाशा, प्रकल्प तपशिल आणि प्रकल्प स्थळाच्या १० किमी अभ्यास क्षेत्रातील पर्यावरणीय माहिती, पाणी वापराचे तपशिल, पाण्याची आवश्यकता, जमीन वापराचे तपशील, विजेची आवश्यकता, मनुष्यबळाची आवश्यकता, सभोवताली उपलब्ध विशिष्ट हवामान विषयक डेटा, विंड रोझ आकृती – डिसेंबर २०२१ ते फेब्रुवारी २०२२ (आयएमडी विशिष्ट), सभोवतालच्या हवेच्या नमुने निरिक्षण करण्याची ठिकाणे, सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेच्या परिणामांचा सारांश, सभोवतालच्या ध्वनी – गुणवत्तेचे निरीक्षण करण्याची ठिकाणे, सभोवतालच्या आवाज पातळी निरिक्षण परिणामांचा सारांश, भूजल नमुना ठिकाणे, भूजल गुणवत्तेचे मुल्यांकन, पृष्ठभागाच्या पाण्याचे नमुने घेण्याची ठिकाणे, पृष्ठभागावरील पाण्याची निरिक्षणे, मातीचे नमुने घेण्याची ठिकाणे, मातीच्या नमुन्याची निरीक्षणे, अभ्यास क्षेत्राचा जमिनीचा वापर नमुना, अभ्यास क्षेत्रातील जमिनीचा वापर जमीन आच्छादन वर्ग, जैविक पर्यावरण, सामाजिक-आर्थिक पर्यावरण, हरितपटटा विकास, पर्यावरण व्यवस्थापन योजना आराखडा, हवा प्रदूषण नियंत्रण, पाणी गुणवत्ता व्यवस्थापन, घरगुती सांडपाणी व्यवस्थापन, ध्वनी प्रदूषण नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन योजना, सामाजिक आर्थिक आणि सामाजिक विकास कार्यक्रम, प्रस्तावित सी.एस.आर. उपक्रम, सामाजिक उपक्रम, निष्कर्ष, प्रस्तावित प्रकल्पाचे फायदे इ. बाबत माहिती सादर करुन प्रस्तावित प्रकल्पाला सहकार्य करणेबाबत निवेदन करण्यात आले. सादरीकरणाची छायांकित प्रत सोबत सहपत्र १ म्हणून जोडत आहे.

वरील सादरीकरणानंतर खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

**प्रश्न क्र. १. श्री. मारुती हरी गणमाळे, राहणार सांगवडेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

म.प्र.नि. मंडळामार्फत आयोजीत जाहीर जनसुनावनीमध्ये आता जे सादरीकरण झाले त्या अनुषंगाने कंपनी व्यवस्थापनाने पर्यावरण संरक्षणासंबंधी नुकसान भरपाई विषयी कंपनीचे काय धोरण आहे ते जाहीर करावे अशी विनंती करतो.

**उत्तर** -

प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सांगितले की, सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे पर्यावरणाची पुरेपुर काळजी घेण्यात येणार आहे, हा प्रकल्प फक्त टीएमटी बार उत्पादनाचा आहे, त्यामध्ये एमएस बिलेटचे उत्पादन होणार नाही एमएस बिलेटचे कन्वेअर बेल्ट तर्फे येणार आहे, कच्च्या मालाच्या वाहतुकीची या प्रकल्पाला गरज नाही, फक्त जे फिनीशड प्रॉडक्ट म्हणजे टीएमटी बार यांचे उत्पादन घेऊन वाहतूक करणार आहे आणि एमओईफ, सीपीसीबी व म.प्र.नि. मंडळाच्या मानकांच्या विहित मर्यादेत ठेवण्याबाबत पुरेपूर काळजी घेऊन ती मानके विहित मर्यादेत ठेवली जातील, तसेच पर्यावरण ईएमपी बजेट मध्ये सुध्दा लेखाजोखा मांडण्यात आलेला आहे त्यामध्ये हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इ. साठी खर्चाचा लेखाजोखा मांडण्यात आला आहे, हरितपटटा ०.९ हेक्टरवर विकसीत करण्यात येणार आहे, एकूण १८०० झाडांची लागवड करण्यात येणार आहे, प्रस्तावित प्रकल्पाच्या १० किमी अभ्यास परिसरात सी.एस.आर. निधी अंतर्गत १० लाख रुपये खर्च करण्यात येईल, सदरील ग्रामपंचायतींच्या सुचनांप्रमाणे कंपनी त्यावर निर्णय घेऊन सभोवतालचे पर्यावरण कसे चांगले राहील, लोकांना कसा फायदा होईल याची काळजी घेणार आहे.

**प्रश्न क्र. २. श्री. विठू सुर्यकांत चौगुले.**

प्रस्तावित प्रकल्प राबविल्यानंतर ग्रामस्थांना त्याचा काय फायदा होणार ?

**उत्तर** –

पर्यावरणविषयक सल्लागार यांनी सांगितले की, सादरीकरणाममध्ये आपण बघितले असेल की, सध्य प्रकल्पामध्ये एकूण ९० मनुष्यबळ व प्रस्तावित प्रकल्पामध्ये ६० मनुष्यबळाची गरज भासणार आहे त्यामुळे कामगारांची कुशलता व क्षमतेनुसार सभोवतालच्या परिसरातील लोकांना प्राधान्य देण्यात येईल. याशिवाय सभोवतालच्या गावांना सी.एस.आर. निधी अंतर्गत विविध उपक्रम करण्याचे प्रयोजन असून त्यामधील निधी ग्रामपंचायतींच्या सूचनांप्रमाणे खर्च केला जाईल. त्यामुळे सदरील प्रकल्प झाल्यामुळे स्थानिक लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जसे ट्रक वाहतूक रोजगार मिळेल व स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळेल.

**प्रश्न क्र. ३. नितीन सदाशिव हवालदार, राहणार हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

मला कंपनी व्यवस्थापनाला प्रश्न विचारायचा आहे की, आपली कंपनी येथे किती वर्षे चालू आहे व आपण हलसवडे गावातील किती लोकांना कंपनीमध्ये काम दिले आहे, दुसरे आपण

प्रदूषण करणार व आम्ही ड्रायव्हर व क्लीनरचे काम करायचे काय, तसेच गट नं. २३५ मध्ये माझी जमीन आहे माझी म.प्र.नि. मंडळाच्या अधिका-यांना विनंती आहे की, आपण फक्त एकदा माझ्या ऊस शेतीतून फेरी मारावी, आपले सर्व अंग प्रदूषणामुळे काळे होणार, तसेच मी माझ्या बोअरचे पाणी तपासून घेतले आहे त्या अहवालानुसार ते पाणी पिण्यास अयोग्य आहे, येथे अनेक कंपन्या आहेत त्या विस्तारीकरण करत राहतील व त्यांच्या प्रदूषणाचा परिणाम आमच्या आरोग्यावर व शेतीवर होत आहे. या कंपनीने पर्यावरणासाठी काहीही काम केलेले नाही. तसेच हलसवडे येथे काम केले असेल तर दाखवा, आम्ही शाळांना मदत दिलेली आहे, कंपनीने आतापर्यंत कधीही एक रुपया सुध्दा दिलेला नाही, आम्हाला हा प्रकल्प नको आहे व सदरील कंपनी बंद करावी असे माझे म्हणणे आहे. मी स्वत: शेतकरी आहे,आमच्या शेतीची अतिशय वाईट परिस्थिती आहे, आम्ही प्रस्तावित प्रकल्पास पूर्णपणे विरोध करत आहोत, त्यांनी सी.एस.आर. निधी मधून किती खर्च करणार आहोत ते सांगितले पण त्यावर कोण नियंत्रण ठेवणार, आम्ही स्वत:च्या पैशातून झाडे लावून जगवली आहेत, कंपनीने आमच्या गावात किती झाडे लावली आहेत ते सांगा, त्याचे फोटो दाखवा, आपण १० किमी परिसराचा अभ्यास कोणाला घेऊन केला, १०० वडाची झाडे कुठे आहेत ते दाखवा व कोण मोजायला गेले होते ते दाखवा. त्यापुढे ते म्हणाले की, रात्रीच्या वेळी सगळया कंपन्यांच्या आवाजामुळे आम्हाला झोप लागत नाही एवढा आवाज होत असतो, आवाजाचे डेसीबल कसे काढले आम्हाला विचारुन काढले आहे काय, गेली २० ते २२ वर्षे कंपनी येथे आहे तेव्हापासून आपण गावासाठी काय केले आहे ते दाखवा, आपले कामगार रजिस्टर दाखवा आमच्या गावातील एकही कामगार येथे काम करतो काय ? आम्ही हा प्रकल्प १०० टक्के होऊ देणार नाही. मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आहे. आम्हाला प्रकल्प नको आहे.

यावर मा. अध्यक्षांनी आम्ही आपले म्हणणे जसेच्या तसे शासनास कळविणार आहे असे सांगितले.

**उत्तर** –

पर्यावरणविषयक सल्लागार यांनी सांगितले की, आपण विचारणा केली की १०० वडाची झाडांची लागवड केली आहे का, सादरी करणामध्ये आम्ही जी झाडांची संख्या दर्शविली ती ०.९ हेक्टर परिसर जो आहे त्याच्यामध्ये लागवड करण्यात येणार आहे, व कोणत्या प्रजातींची झाडे

लावणार आहे त्यांची संख्या आहे, आपले म्हणणे होते की माझ्या शेतातील व आजुबाजुच्या परिसरातील पाणी प्रदूषीत झालेले आहे परंतु हा प्रस्तावित प्रकल्प हा टीएमटी बार म्हणजेच सळई निर्मितीचा प्रकल्प आहे, प्रकल्पाची प्रोसेस डिस्क्रीप्शन महत्वाची आहे, या प्रकल्पामध्ये एम.एस. बिलेटस हे डायरेक्ट येतात व बाजारातील मागणी प्रमाणे टीएमटी बारमध्ये रुपांतरीत केले जाते, या प्रकल्पामध्ये गरम लोखंडापासून सळई तयार केली जाते व ती थंड करण्यासाठी फक्त पाणी वापरले जाते. त्यानंतर हरितपटटा विकसित करण्यासाठी झाडांना देण्यासाठी तसेच मालवाहतुक करताना रोडवरील धुळीचे नियंत्रणासाठी पाणी शिंपडण्याकरिता आणि घरगुती वापरासाठी पाणी लागणार आहे. त्यामधून फक्त घरगुती पाण्याच्या वापरातून सांडपाण्याची निर्मिती होते व त्यासाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवण्यात येणार असून प्रक्रियाकृत सांडपाणी प्रकल्पामध्ये हरितपटटा विकासासाठी वापरण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त प्रकल्पामधून इतर कुठलेही प्रदूषीत पाणी निर्माण होत नाही. तसेच गावाच्या विकासासाठी सी.एस.आर. अंतर्गत जे १० लाखाचे बजेट आहे त्यासाठी आपल्या गावाची काय गरज आहे ते ग्रामपंचायतीमार्फत कंपनीला सांगा तो पैसा ग्रामपंचायतीला देण्यात येईल किंवा कंपनी मार्फत खर्च करण्यात येईल व जे ग्रामपंचायतीला मान्य आहे त्या अंतर्गत हे काम केले जाईल असे सांगितले. तसेच जो काही मजूर वर्ग लागणार आहे त्याची कुशलता आणि क्षमता विचारात घेवून त्यांना या कंपनीमध्ये कामवर घेण्याचे प्रयोजन आहे. त्यामुळे सदरील कारखान्यामध्ये सळई गरम करताना कारखान्यातील कामाच्या ठिकाणचे वातावरण गरम असते या वातावरणामध्ये, ज्यामध्ये ९०० ते १२०० डिग्री तापमान असते त्याठिकाणी काम करण्यासाठी इच्छुक असणा-या कामगारांना घेतले जाईल असे सांगितले.

**प्रश्न क्र. ४. श्री. कृष्णा आनंदा मडसूळकर, माजी उपसरपंच, पट्टणकोडोली, जि. कोल्हापूर.**

एखादी कंपनी आपल्या राज्यातून दुस-या राज्यात जाते तेव्हा रोजगार गेल्यामुळे गवगवा / दंगा होतो, आणि एखादी कंपनी विस्तारीकरणासाठी मागणी करत असेल तर मुळ कंपनीस विस्तारीकरण करण्यास आमचे १०० टक्के समर्थन असणार. त्याचे कारण सर्वात प्रथम रोजगार आहे. आपल्या प्रकल्पामध्ये आमच्या गावांतील कुशल कामगार नसले तरी अकौंटीग व इतर काम / रोजगार द्यावेत व त्यामध्ये हलसवडे गावाला सर्वात प्रथम प्राधान्य द्यावे अशी आमची विनंती आहे. ज्यांना प्रदूषणाची झळ बसते त्यांना रोजगार दिला पाहिजे. दुसरा मुददा म्हणजे

हरित विकास पटटा तयार करताना त्याची तपासणी झाली पाहिजे तसेच वृक्षारोपण केलेली झाडे जगली पाहिजेत व ती वारंवार पाहिली पाहिजेत त्यासाठी त्यांची वेळोवेळी तपासणी केली पाहिजे. निसर्ग मुद्दा सी.एस.आर बाबत आहे त्यामध्ये आमच्या गावात पुर आला त्यावेळी या कंपनीने गावातील १२० कुटुंबाना जेवण, ब्लँकेट इ. पुरविलें होते याबद्दल मी या कंपनीचे आभार मानतो. तसेच सि.एस.आर. ची रक्कम एक टक्के वरुन दोन टक्के करावी कारण रुपये १० लाख ही रक्कम अत्यल्प आहे तसेच ही रक्कम प्रथम प्राधान्याने हलसवडे गावासाठी खर्च करुन राहिलेली इतर गावांना द्यावी असे मत मांडले. तसेच शैक्षणिक साहित्य, गरोदर मातांना मदत, प्लँटेशन इ. करावे. मी पट्टण कोडोली येथे राहतो पण प्रकल्प हलसवडेमध्ये असल्याने प्रथम हलसवडे गावाला प्राधान्य द्यावे. तसेच प्रकल्पातील रोड कच्चे किंवा धुळीचे नसावेत काँक्रीट असावेत जेणेकरुन लोकांच्या शेतामध्ये धुलीकण येतात त्यावर उपाययोजना करावी अशी विनंती आहे. तसेच उद्योगाला/ प्रकल्प विस्तारीकरणाला सर्वांनी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**प्रश्न क्र. ५. श्री. रवींद्र कांबळे, सदस्य, मौजे हलसवडे ग्रामपंचायत, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

मला कंपनीला एक प्रश्न विचारायचा आहे की, गेल्या तीन वर्षामध्ये कंपनीने अजून एक रुपयाही निधी सी.एस.आर. अंतर्गत आमच्या हलसवडे गावासाठी खर्च केलेला नाही त्यामुळे गावाचा फायदा झालेला नाही याउलट तोटाच झालेला आहे. तसेच आमचे गाव पूर्णपणे प्रदूषीत झालेले आहे. तसेच आमच्या गावातील ब-याच लोकांना रोजगार नाही कारण आमच्या गावातील एकही युवक या कंपनीमध्ये कामाला घेतला जात नाही व सदरील कंपनी आमच्या गावातील हवेचे व पाण्याचे प्रदूषण करते. आपण आपल्या सादरीकरणात पाण्याचा पीएच ७.९ आहे असे सांगितले आहे परंतु सदरील पाणी पिण्यास योग्य आहे की नाही हे सुध्दा आपण व्यवस्थित सांगितलेले नाही कारण ते पाणी पिण्यायोग्य नसते त्यामुळे आमच्या गावातील पाणी १०० टक्के प्रदूषीत झालेले आहे. २० वर्षापुर्वी कंपनी झाली तेव्हा गावात पाण्याची सोय नव्हतो परिस्थिती अत्यंत वाईट होती, आज पाणी आले आहे परंतु अवती भोवती कंपन्यांमुळे पाण्याचे प्रदूषण झालेले असून त्यामुळे आम्हास राहणे मुश्कील झाले आहे. तसेच एमआयडीसी मुळे गावामध्ये रोगराई व भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीकरणाला आमचा विरोध होता व तीचे विस्तारीकरण आम्ही बंद पाडलेली आहे कारण सध्याच्या एमआयडीसीमुळे प्रदूषण झालेले आहे. मे. आर्या या कंपनीमुळे प्रदूषण वाढलेले आहे

त्यामुळे ऊस शेती, जमीन काळी पडलेली आहे व त्या प्रदूषणामुळे ऊसाचे वाडे जनावरे खात नाहीत तसेच ऊसाला योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे आम्ही शेती करायची की नाही असा प्रश्न त्यांनी केला. तसेच आसपासच्या गावामध्ये, पट्टणकोडोलीमध्ये मे. आर्या कंपनी मार्फत काम केले जाते तसेच निधी खर्च केला जातो मग हलसवडे गावासाठी का केला जात नाही त्यामुळे हलसवडे गावांतील लोकांना काय फायदा असा प्रश्न उपस्थित केला. मे. आर्या कंपनीने हलसवडे गावातील किती लोकांना रोजगार दिला याची आकडेवारी द्यावी तसेच हलसवडे गावात झाडे लावण्यात आलेली नाहीत व आमच्या प्राथमिक शाळेला मे. आर्या कंपनी कडून एक रुपया सुध्दा निधी दिलेला नाही. त्यामुळे हे विस्तारीकरण आम्ही होऊ देणार नाही, ग्रामपंचायत सदस्य म्हणून माझा प्रसतावित प्रकल्पास विरोध राहील व हा विषय गावसभेत मांडून त्याला आम्ही मंजुरी देणार नाही व विरोध राहील.

**प्रश्न क्र. ६. श्री. अरुण खोचगे, राहणार हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

आता माझ्या मित्रांनी / गाववाल्यांनी कंपनीने हलसवडे गावाला कोणतीही मदत केलेली नाही असे आता सांगितले, मात्र हलसवडे गावामध्ये एक हॉल बांधलेला आहे ज्यामध्ये सामाजिक कार्यक्रम होत असतात त्या हॉलला मे. आर्या स्टील या कंपनीने सर्व सळई दिलेली आहे व तसा तेथे बोर्ड लावलेला आहे. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे मे. आर्या कंपनीमुळे आम्हाला रोजगार मिळतो व तीसरी गोष्ट, या कंपनीचा सर्वात जवळची शेतजमीनीचा शेतकरी मी आहे, आमचा गट क्र. ७९ असून येथून १०० फुटावर आमची १६ एकर शेती आहे व त्यामध्ये आमची स्वत:ची पाण्याची विहिर आहे परंतु आम्हाला कुठलाही कंपनीपासून त्रास होत नाही तसेच आम्ही येथेच राहतो तरीही आमच्याकडे धुर येत नाही व कुठलेही पाणी येथे येत नाही.

**प्रश्न क्र. ७. श्री. तानाजी अशोक पाटील, हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

मे आर्या स्टील ही कंपनी सन २००७ पासून आमच्या गावा शेजारी पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यरत आहे. या प्रस्तावित प्रकल्पाबाबतची नोटीस स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेनंतर दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी मी ग्रामपंचायतीला प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देऊ नये म्हणून अर्ज दिलेला होता, त्यासअनुसरुन ग्रामपंचायतीने माझ्या अर्जाची दखल घेऊन कंपनीला रितसर पत्र पाठविलेले आहे. त्यानंतर २० ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रामपंचायतीला पुन्हा अर्ज केला आहे की, या कंपनीचे सध्याचे प्रदूषण व प्रस्तावित

विस्तारीकरणानंतर होणारे प्रदूषण या संदर्भात ग्रामसभा बोलवावी आणि हा विषय गावसभेपुढे व्हावा जेणेकरुन गावाच्या आरोग्याचा, शेतीचा व पाणी प्रदूषणाचा खूप मोठा प्रश्न आहे तो गावाच्या समोर झाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. त्यापुढे त्यांनी सांगितले माझा पहिला प्रश्न आहे की, मे. आर्या स्टील प्रा. लि. या कंपनीची स्थापना २००७ पासून असून आज २०२३ पर्यंत किती कर्मचारी आहेत, २००७ पासून कंपनीने सांगितल्याप्रमाणे किती लोकांना फायदा झालेला आहे, तसेच कंपनीने गावातील किती लोकांची व कुणाची वाहने वापरली आहेत ते सांगावे, तसेच गावातील लोकांनी सांगितले गावच्या हॉलसाठी कंपनीने सळई दिली, माझे सांगणे आहे की, गावच्या त्याच हॉलसाठी मीसुध्दा रुपये २०,०००/- दिलेले आहेत. गावातील प्रत्येकांनी सहकार्य केलेले आहे व हे करणे भाग आहे, कारण ही सामाजिक जबाबदारी आहे. त्यापुढे त्यांनी सांगितले की कंपनीने हवा प्रदूषणाचा जो सर्वे केला आहे त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, प्रदूषण नाही परंतु गट नं. ३७, ३५, ९५ व ९७ या क्षेत्रामध्ये माझ्या व माझ्या वडीलांच्या नावे एक एकर शेती आहे त्यामध्ये ही जर कोण म्हणत असेल की या कंपनीपासून कोणाचे प्रदूषण होत नाही तर ते खोटे आहे कारण, मी स्पष्ट सांगतो आमच्या शेतामध्ये मोठया प्रमाणात धुळ येऊन पडते व २००७ पुर्वी आम्ही शेतामध्ये भाजीपाला पिकवत होतो तेथे आता ऊससुध्दा पिकत नाही. तसेच एकरी ६० टन उत्पादन देणा-या सुपीक जमिनीमध्ये आता ४० मेट्रीक टन ऊस सुध्दा आता पिकत नाही एवढी अवस्था बिकट आहे. त्यामुळे या कंपनीपासून प्रदूषण होत नाही असा जो दावा केला जातो तो खोटा आहे. तसेच पावसाळयामध्ये जे पाणी ओढ्या नाल्याला येते त्यातुन प्रदुषीत सांडपाणी येते त्यामुळे आमच्या गावक-यांच्या ज्या विहिरी ओढयालगत आहेत त्या सगळया प्रदूषीत झालेल्या आहेत. त्या सगळया विहिरींचे पाणी नमुने घेऊन तपासणी करावी, त्याशिवाय तुम्हाला सत्यता समजणार नाही. सर्वात जास्त ध्वनी प्रदूषण हे आमच्या गावात आहे, आपण ध्वनी प्रदूषणा लेखाजोखा मांडला, हा जो सर्वे आपण केलेला आहे तो आपण कुठल्याही ग्रामपंचायत, स्थानिक लोक, समाजिक संस्था, कार्यकर्ते यांना घेवून केलेला नाही व हे आपण सर्व मनमानीने केलेले आहे. त्यामुळे कंपनी कडून आम्ही असे करणार आहे हे जे सांगता याची शाश्वती नाही. आज रोजी आमच्याकडे सबळ किंवा कागदोपत्री पुरावा नसला तरी आम्ही माहिती घेऊन रिपोर्ट बनवून कायदेशीर लढा लढू पण कुठल्याही परिस्थितीत या कंपनीला विरोधच राहील. ही कंपनी व्हावी अशी आमच्या गावक-यांची अजिबात इच्छा नाही. काही लोक आपल्या वैयक्तीक स्वार्थ किंवा कुटुंबाचा फायदा यासाठी प्रकल्पास पाठींबा देत आहेत, कारण

हलसवडे गावाला यांचा फायदा झालेला नाही. त्यामुळे कंपनीचे विस्तारीकरण आमच्या गावच्या हद्दीत करत आहे, कारण औद्योगिक क्षेत्र वेगळे आहे, त्यासाठी सदरील प्रस्तावित प्रकल्पाला आमचा ग्रामस्थ म्हणून विरोध आहे तसेच, शेतकरी म्हणून सुध्दा विरोध आहे कारण आमचे जीवन धोक्यात आहे.

**उत्तर –**

पर्यावरणविषयक सल्लागार यांनी सांगितले की, आपण मांडलेल्या मुद्यांचे मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. तसेच स्थानिक लोकांना त्यांच्या कुशलतेप्रमाणे व काम करण्यास तयार असतील तर प्राधान्याने रोजगार देण्यात येईल. यापुढे ते म्हणाले की आपला जो शेतीचा मुददा आहे त्याबाबत मी अगोदरच शंका निरसन केलेले आहे, हवा, पाणी, उत्पादन प्रक्रिया इ. सर्व विचारलेल्या प्रश्नांबाबत माहिती दिलेली आहे.

यावर मा. अध्यक्षांनी आपण दि. ३०-०९-२०२३ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत आमच्याकडे दिल्यास या जाहीर जनसुनावणीचा एक भाग म्हणून ते इतिवृत्तासोबत जोडून त्याची इतिवृत्तामध्ये नोंद घेऊ असे तक्रारदार यांना सांगितले तसेच शासनाकडून प्रस्तावित प्रकल्पास परवानगी दिली गेली तर त्याचा हलसवडे गावात ६० रोजगारांबाबत प्रथम जाहीरनामा लावावा अशी प्रकल्प प्रस्तावक यांना सूचना केली.

**प्रश्न क्र. ८. श्री. तानाजी आप्पासाहेब पाटील, राहणार हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

असे म्हणणे चुकीचे आहे की कंपनीमार्फत आजूबाजुच्या गावातील लोकांना रोजगार दिला जात नाही कारण आज माझ्या चार गाडया मे. आर्या कंपनीकडे भाड्याने लावलेल्या आहेत.

**प्रश्न क्र. ९. श्री. हरिश्चंद्र धोतरे, अध्यक्ष, मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कागल हातकणंगले पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, जि. कोल्हापूर.**

आताच सी.एस.आर. बाबत चर्चा झाली त्याअनुषंगाने गेल्याच वर्षी कागल हातकणंगले पंचतारांकीत औद्योगिक वसाहत येथे कामगारांच्या सोईसाठी इ.एस.आय. हॉस्पिटल झालेले आहे त्यामध्ये सर्व उद्योजकांचा वाटा आहे, त्यात ११ लाख रुपये एवढा अगदी मोलाचा वाटा मे. आर्या स्टील्स रोलींग प्रा. लि. चे श्री. अलोक बंसल यांनी दिलेला आहे. एमआयडीसी वसवण्यापूर्वी हलसवडे गाव हे संपूर्ण क्षेत्र ड्राय एरिया होता, आता एमआयडीसी झाल्यामुळे इरिगेशनचे पाणी आले आहे त्यामध्ये एमआयडीसीच्या पाण्याचा सुध्दा भाग आहे. तसेच

एमआयडीसीमध्ये जे पाणी येते ते पाझरल्यामुळे आजूबाजुच्या शेतामध्ये येते, त्यामुळे आजुबाजुची शेती हरित झालेली आहे. त्यापुढे ते म्हणाले की, प्रदूषणाचा भाग येतो तो प्रक्रिया उद्योगांमुळे त्यामध्ये टेक्स्टाईल उद्योगामधून जे प्रदूषीत सांडपाणी बाहेर पडते त्यासाठी सीईटीपी लावलेला होता तो सध्या २५ टक्के इफिनशियन्सीने चालू आहे, कारण शासनाने मागील दोन वर्षापूर्वीच या उद्योगांना शुन्य निर्गत सक्तीचे केले आहे त्यामुळे या कंपन्यानी स्वत:चे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बसविलेले आहेत व प्रक्रियायुक्त पाणी उद्योगाच्या क्षेत्रातील जागेमध्ये वापरले जाते. भविष्यात प्रदूषण होणार नाही याची सर्व उद्योजक काळजी घेत आहेत. सद्यस्थितीत एमआयडीसी मुळे काही गावांचा तोटा झाला असेल, पण तोटयापेक्षा फायदेच जास्त झालेले आहेत कारण आजूबाजुच्या गावातील लोकांचे राहणीमानात सुधारणा झाली आहे, त्यामुळे जर एमआयडीसी व उद्योग आले नसते तर या भागाचा एवढा विकास झाला नसता. तसेच जरी गावाला, तालुक्याला फायदा झाला नसेल तरी शासनाकडे जे उत्पन्न जाते ते शासनामार्फत आपल्या लोकांना पोहाचवले जाते. त्यापुढे ते म्हणाले की, कोणीही वैयक्तीक स्वार्थासाठी समाजाचा, देशाचा विकास थांबविण्याचा प्रयत्न करु नये. या प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी त्यावेळी आजुबाजुच्या परिसरातील हवा, पाणी व जमिनीची गुणवत्ता तपासणीसाठीचा सर्वे करण्यात आला त्यावेळी आमच्या असोसिएशनला माहिती दिली असती तसेच आजुबाजूच्या लोकांना सहभागी करुन घेतले असते तर लोकांच्या समोर सर्व गोष्टी होताहेत असे दिसले असते व त्यामुळे लोकांचा विरोध कमी झाला असता. तसेच आजुबाजूच्या गावातील लोकांना रोजगार दिला जात नाही असे नसून मे. आर्या स्टील सारख्या कारखान्यामध्ये उत्पादन करत असताना भटटीचा वापर होत असल्यामुळे इथले तापमान खूप जास्त असते अशा वातावरणात आजूबाजुची माणसे काम करत नाहीत. त्यापुढे त्यांनी सांगितले की, आम्ही रोजगार मेळावा घेतला असता तेथील आजूबाजुच्या गावातील लोकांना व्हाईट कॉलर जॉब हवे असतात व व्हाईट कॉलर जॉब हे परत परत भरले जात नाहीत कारण ही पदे रिटयरमेंटपर्यंत रिक्त होत नाहीत, त्यामुळे त्या जागा भरता येत नाही. वरील बाबीचा सर्वांनी विचार करावा.

**प्रश्न क्र. १०. श्री. सुमित रुकडे, राहणार कागल, जि. कोल्हापूर.**

या कंपनीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेले आहेत. कंपनीमुळे फायदा झालेला आहे.

**प्रश्न क्र. ११. सौ. साळोखे, ग्रामपंचायत, हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**

सी.एस.आर. फंडातून करावयाचे कामाबाबत आम्ही ग्रामपंचायत, हलसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचे मार्फत लेखी स्वरुपात कळवतो.

**प्रश्न क्र. १२. श्री. सचिन शिंदे, पट्टणकोडोली, जि. कोल्हापूर.**

अशा प्रकारच्या स्टील कंपन्या नागपूर भागामध्ये सर्वाधिक आहेत व त्यामधून संपूर्ण देशाला तेथुन सळई पुरविली जाते. परंतु कोल्हापूर जिल्हयात अशा दोनच फॅक्टरी असल्यामुळे असे प्रकल्प वाढावेत असा आपण जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे जेणेकरुन आजुबाजुच्या लोकांना काम मिळतील. त्यामुळे माझे प्रस्तावित प्रकल्पास समर्थन आहे.

**प्रश्न क्र. १३. श्री. धर्मवीर कांबळे, हुपरी, जि. कोल्हापूर.**

येथील उद्योगांनी भूमिपुत्रांना प्राधान्य मिळत नाही त्यांना प्रथम प्राधान्य द्यावे कारण ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत अश्या फक्त २० ते २५ टक्के स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आलेले आहेत. त्यापुढे त्यांनी सांगितले की, विस्तारीकरण करणेस आमची हरकत नाही परंतु तळंदगे भागातील शेतामध्ये पूर्ण प्रदूषण झालेले आहे त्यामुळे शेती खराब होत आहे व विहिरीचे पाणी खराब होत आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणाचे नियम सर्वांनी पाळावेत व प्रकल्प व्हावा पण त्यामध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य द्यावे, प्रत्येक गावातील लोकांना काम द्यावे एवढीच विनंती करतो.

यानंतर मा. अध्यक्षांनी प्रस्तावित प्रकल्पाबद्दल श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य यांना काही शंका असतील तर त्या विचाराव्यात अशी विनंती केली.

श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य यांनी सांगितले की, ग्रामस्थांनी त्यांच्या भावना चांगल्या पध्दतीने मांडलेल्या आहेत, दोन्ही बाजुंनी व्यवस्थीत मुददे मांडले आहेत. कंपनीला माझी विनंती आहे की, ग्रामस्थ जे काही बोलले त्याप्रमणे कंपनीने हेल्थ आणि सेफटी यांसाठी आपण काय सुविधा पुरविणार तसेच आरोग्याबाबत आपण वैयक्तीक काय करणार आहात, तसेच हवा प्रदूषण याबाबत पुन्हा एकदा मार्गदर्शन करावे.

पर्यावरणविषयक सल्लागार यांनी सांगितले की, आरोग्याच्या बाबतीत बोलायचे तर कंपनीमध्ये काम करणा-या कामगारांची आरोग्य तपासणी केली जाते. यापुढे ग्रामस्थ व अधिका-

यांच्या सूचनेनुसार हलसवडे गावातील ग्रामस्थांची आरोग्य संदर्भातीत गरजेनुसार कॅंप आम्ही आयोजित करु, त्याचा खर्च कंपनी करेल, त्यामुळे कोणत्या संदर्भात / विषयी कॅंप पाहिजे ते ग्रामपंचायतीने कंपनीला कळवावे, जेणेकरुन आम्ही त्याच्यावर सकारात्मक निर्णय घेऊन पूर्ण करु ही कंपनीतर्फे ग्वाही देतो.

यानंतर श्री. प्रमोद रा. माने, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी विनंती केली की, लेखी स्वरुपामध्ये निवेदने घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळामार्फत येथे व्यवस्था करण्यात आलेली असून ज्या व्यक्तींना लेखी निवेदन दयावयाचे आहे त्यांनी येथे उपस्थित असलेल्या म.प्र.नि. मंडळाच्या अधिका-यांकडे लेखी निवेदन देवून त्याची पोहोच घ्यावी. तसेच म.प्र.नि. मंडळास अगोदरच प्राप्त झालेली लेखी निवेदने व झालेली चर्चा यांची नोंद घेऊन त्याचे इतिवृत्त SEEC यांचेकडे सादर केले जाईल.

यानंतर मा. श्री. संजय तेली, अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सांगितले की, जनसुनावणी दरम्यान ग्रामस्थांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्यांची कंपनीने निश्चितच दखल घेतली पाहिजे, मुळ प्रकल्पामध्ये अजूनही स्थानिक लोकांना रोजगार द्यावे, आजुबाजुच्या गावांच्या काही मागण्या आहेत त्यांना गावातील विकासाच्या बाबतीत कपंनीने मदत करावी तसेच, सी.एस.आर. रक्कम वाढवावी या मागण्या वैयक्तीक नसून गावाच्या विकासासाठी आहेत कारण त्यांच्या मागण्या रास्त आहेत. तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्यासाठी प्रत्येक कंपनीने आपला खर्चाच्या निधीत निश्चितच वाढ केली पाहिजे. तसेच त्यापुढे ते म्हणाले की, ग्रामस्थांच्या भावना निश्चितच शासनाकडे जाणार आहेत त्याबाबत कंपनीने ऊपाययोजना करावी, ग्रामस्थांना विश्वासात घ्यावे तसेच रोजगार उपलब्ध (एम्पलॉयमेंट पोटेंन्शियल) करण्याबाबत उपाययोजना कराव्यात कारण तरुणांपुढे बेरोजगारीचा मोठा प्रश्न आहे, त्यामुळे प्रकल्पास मान्यता मिळाल्यानंतर ज्यांच्या जमिनीवर प्रकल्प उभे आहेत त्यांना मदत होईल असे काम करावे अशी मा. अध्यक्षांनी सूचना केली.

शेवटी मा. अध्यक्षांनी सर्व ग्रामस्थ, नागरीक, लोकप्रतिनिधी यांनी जनसुनावणीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला, प्रतिक्रिया नोंदविल्या त्याबद्दल आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांची प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

**(प्रमोद रा. माने)**
संयोजक
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

**(ज. शं. साळुंखे)**
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

**(संजय तेली)**
अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर